# मार्टिन लूथरने देवाच्या लोकांना पवित्र शास्त्र वाचू दिले

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभु मार्टिन लूथरने पवित्र शास्त्रातील महान सत्ये लक्षावधी विश्वासणाऱ्यांमधील चुकीचे शिक्षण दुरुस्त करण्यासाठी जाहिरपणे सांगितली. ती सत्ये आपलीशी कारण्यासाठी मुलांना साहाय्य कर''

सैतान म्हणतो:



**पवित्र शास्त्र वगैरे गोष्टी विसरून जा! लोकांना जे आवडते तेच त्यांना शिकवा.**

आपण देवाचे वचन शिकवण्याऐवजी मनुष्यांचे रितीरिवाज शिकवतो तेव्हा आपण सैतानाला संतुष्ट करतो.

उपलब्ध वेळ आणी मुलांचे वय ह्यांना अनुरुप असे **कार्यक्रम** निवडा येशूने परुशांना काय सांगितले ते मार्क 7:1-13 ह्या शास्त्रभागातून मोठया मुलाने किंवा प्रौढाने सांगावे.


मुलांना **विचारा:**

- परुशी हे धार्मिक पुढारी होते. देवाच्या आज्ञा शिकवण्या ऐवजी ते कशाचे शिक्षण देत होते?
- आपण मनुष्यांच्या आज्ञांऐवजी पवित्र शास्त्र का शिकवावे?

पवित्र शास्त्राचा खंदा समर्थक मार्टिन लूथर ह्याच्या वृत्तांताचे **नाटयीकरण करा.**

- मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करुन वेळ ठरवा.
- ह्या वृत्तांतातील सर्वच भागांचे तुम्ही नाट्यीकरण केले पाहिजे असे नाही.
- मोठया मुलांनी लहान मुलांची तयारी करावी.
- मोठया मुलांना किंवा प्रौढांना लूथर मदतनीस, अधिकारी व निवेदक ह्या भूमिका करण्यास द्या.
- लहान मुलांना शेतकरी व सैनिक ह्या भूमिका करण्यास द्या.
- निवेदकाने हा भाग वाचून दाखवावा ''प्रिय प्रभू मार्टिन लूथरने पवित्र शास्त्रातील महान सत्ये लक्षावधी विश्वासणाऱ्यांमधील चुकीचे शिक्षण दुरूस्त करण्यासाठी जाहिरपणे सांगितली ती सत्ये आपलीशी करण्यासाठी मुलांना सहाय्य कर.''

**निवेदक:** ''लूथर हा जर्मनीतील एक रोमन कॅथॉलिक मठवासी होता. आपल्याला त्याच्याबद्दल इतिहासाच्या पुस्तकातून माहिती मिळते पवित्र शास्त्र लिहून झाल्यानंतर बऱ्याच काळाने त्याचा जन्म झाला त्यामुळे पवित्र शास्त्रातून त्याची माहिती मिळत नाही.''



**Martin Luther**

**शेतकरी:** तुम्ही जणू काही मद्यपान केले आहे असा अभिनय करीत चाला काहीजण चालता चालता खाली पडतील.

**मदतनीस** (लूथरला): ''मार्टिन लूथर काही तरी करा! तुम्ही आमचे पाळक आहात! ह्या शेतकऱ्यांनी मद्यपान केले आहे आणि ते त्यांच्या मनाप्रमाणे वागून वाईट गोष्टी करीत आहेत याला कारण टेटझेल!''

**लूथर:** (रागाने) ''कोण टेटझेल?''

**मदतनीस:** ''तो रोमहून आला आहे, पोपसाठी सेंट पीटर्स कथेड्रल बांधण्यासाठी तो पैसे गोळा करीत आहे तो लोकांना सांगत आहे की तुम्ही याकरीता उदारहस्ते दान दिले तर चर्च तुमच्या सर्व पातकांची क्षमा करील,''

**लूथर:** ''नाही! लोकांना असे पैसे देऊन त्यांचे तारण विकत घेता येत नाही! देवाकडून मिळणारी कृपा व पाप क्षमा आमच्याकडे स्वर्गातून रोमच्या पोप द्वारे येत नाही मी निषेधाचे पत्रक लिहून ते चर्चच्या दारावर अडकवून ठेवीन म्हणजे प्रत्येकाला ते पहायला मिळेल'' (कागदावर काही लिहिल्याचा अभिनय करुन ते दारावर अडकवा)

**मदतनीस:** कागदाकडे पाहा मग म्हणा, ''ह्या कागदावरचे एक अक्षरही मला समजत नाही हे सगळे लॅटिन भाषेत लिहिलेले दिसते''

**निवेदक:** ''कोणीतरी लूथरच्या निषेध पत्रकाची नक्कल प्रत काढून छापली आणि त्याच्या प्रती सर्व युरोप भर वाटण्यात आल्या चर्चचे अधिकारी नंतर लूथरला काय म्हणाले ते ऐका!''

**अधिकारी:** (लूथरला) ''रोममधील पोप अतिशय संतापले आहेत. पवित्र रोमन साम्राज्याच्या सम्राटाने असा आदेश दिला आहे की, तू लिहिलेले निषेध पत्रक मागे घे,''

**लूथर:** ''मी जे काही लिहिले आहे ते सर्व पवित्र शास्त्रातील आहे. आणि ते मागे घेणे मला शक्य नाही''

**अधिकारी:** असे असेल तर मग पोप तुला मंडळीतून काढून टाकतील आणि तू हे असेच सुरु ठेवले तर सम्राट तुला अग्नीच्या तोंडी देईल''

**लूथर:** ''येशूने मार्क 7:6-9 ह्या वचनात काय म्हटले आहे ते ऐका 'त्याने त्यांना उत्तर दिले, 'तुम्हा ढोंग्यांविषयी यशयाने चांगलाच संदेश देऊन ठेवला आहे. त्याचा लेख असा: हे लोक ओठांनी माझा सन्मान करितात, परंतु त्यांचे अंत: करण माझ्यापासून दूर आहे. ते व्यर्थ माझी उपासना करितात, कारण ते शास्त्र म्हणून जे शिकवितात, ते असतात मनुष्यांचे नियम: तुम्ही देवाची आज्ञा बाजूला सारुन देता व माणसांच्या संप्रदायाला चिकटून राहता......तुम्ही आपला संप्रदाय पाळण्याकरीता देवाची आज्ञा मोडण्याचा छान मार्ग शोधून काढला आहे!''

**निवेदक:** अधिकाऱ्यांनी लूथरला तेव्हाच्या सम्राटाची भेट घेऊन चर्चा करण्यास भाग पाडले.

**शिपाई:** लूथरचे दंड पकडून त्याला अधिकाऱ्यासमोर आणा.

**अधिकारी:** ''तुझ्या लिखाणाच्या सर्व प्रती आमच्याकडे आहेत, ते सर्व लिखाण तू आत्ताच्या आत्ता मागे घे!''

**लूथर:** ''तुम्ही मला शास्त्रलेखातून माझी चूक दाखवून देत नाही तोवर मी सत्य नाकारणार नाही ही इथे मी उभा आहे. देव माझे सहाय्य करो!''


**शिपाई:** ''ह्याला ठार मारा!'' याला अग्नीकुंडात फेका! ''ह्याची जीभ कापा!'' अशी वाक्ये मोठयाने बोला.

**निवेदक:** ''या चौकशी नंतर लूथरच्या मित्रांनी सम्राटाने त्याला ठार मारु नये म्हणून एका किल्ल्यात लपवून ठेवल,''

''तिथे त्याने प्रथमच पवित्र शास्त्राचा अनुवाद जर्मन भाषेत केला,''

''इनर राष्ट्रांमधील विश्वासणाऱ्यांनी लूथरचा आदर्श समारे ठेवला आणि येशूवर विश्वास ठेवणाऱ्यांचे देव प्रीतीने तारण करतो असे शिक्षण दिले.''

"या शिक्षणाचा युरोपच्या बहुतेक भागात प्रसार झाला आणि सुवार्तावादी चळवळीचा जन्म झाला."



**पाठ करा** स्तोत्र 119:11 ''मी तुझ्याविरुद्ध पाप करु नये म्हणून मी आपल्या मनात तुझे वचन जपून ठेविले आहे''

मुलांना हृदयाचे **चित्र काढून** त्यामध्ये पवित्र शास्त्राचे चित्र मुलांना काढायला सांगा हे चित्र ते मोठया माणसांना उपासनेच्या दरम्यान दाखवतील आणि देवाचे वचन मनापासून शिकणे हाच ते जपून ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे हे समजावून सांगतील.

**कविता** स्तोत्र 119:9-11 ही तीन वचने तीन मुलांना प्रत्येकी एक म्हणायला सांगा.

तरुण आपला वर्तनक्रम कशाने शुद्ध राखील?
तुझ्या वचनानुसार तो राखण्याने
अगदी मनापासून मी तुझा शोध केला आहे,
तुझ्या आज्ञांपासून मला बहकू देऊ नको.
मी तुझ्याविरुद्ध पाप करू नये म्हणून
मी आपल्या मनात तुझे वचन जपून ठेविले आहे.

**मोठया मुलांना** मार्क 7:1-23 ह्या शास्त्रभागातून देवाच्या आज्ञा पाळण्या विषयी येशूचे परुशांशी झालेले संभाषण कविता, गीत किंवा छोटयाशा नाटिकेच्या रुपात लिहायला सांगा. आमच्या तोंडातून येणारे शब्द शुद्ध-स्वच्छ असतील याची खात्री करुन घ्या.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभु, तुझी आमच्यावर प्रीती आहे म्हणून तू आमचे तारण करतो आणि आम्हांला आमच्या स्वत: च्या कर्मांनी स्वर्गात जाण्याचा मार्ग कमावता येत नाही असे शिक्षण देणारे मार्टीन लूथर व इतर ह्यांच्या प्रमाणे आम्हांला निर्भय होण्यास साहाय्य कर.''

Copyright 2005 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net